
# सायं.दै महाराष्ट्र आरंभने केलेल्या बातमीचा अंदाज ठरला खरा!

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – १९२ ■ सोमवार दि.३१ मार्च २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रु. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 192 ■ Monday Dt. 31 March 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4



# आता काय खून होण्याची वाट पाहताय का?

# बीडच्या कारागृहात वाल्मिक कराड, सुदर्शन घुलेला मारहाण?

## पालकमंत्री अजितदादा, आतातरी याकडे गांभीर्याने लक्ष देऊन, बीडच्या कारागृहातील आरोपींना इतर जिल्ह्यातील कारागृहात हलवा

■ बीड जिल्हा कारागृहातील सुरक्षेवर प्रश्नचिन्ह; प्रशासनाने वेळीच योग्य खबरदारी का घेतली नाही?

■ कारागृह प्रशासनाच्या संभाव्य हलगर्जीपणामुळे ही घटना घडल्याचा आरोप केला जात आहे?

■ मारहाणीत गंभीर दुखापत झाली तर वाल्मीक कराड व सुदर्शन घुलेला वैद्यकीय उपचारासाठी बीडच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले जाईल का?



बीड । प्रतिनिधी

मस्स्जोग येथील गाजलेल्या सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी म्हणून बीड जिल्हा कारागृहातील कोठडीत असलेले वाल्मिक कराड आणि सुदर्शन घुले यांना कारागृहातील इतर दोन कैद्यांनी मारहाण केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याबाबत सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ ने मागील एका अंकात बातमी प्रकाशित केली होती की, बीडच्या कारागृहात गँगवॉर होण्याअगोदर आरोपींना इतर जिल्ह्यातील कारागृहात रवानगी करावी, तसेच दैनिक महाराष्ट्र आरंभ चा तो अंदाज आज खरा ठरला आहे. महादेव गित्ते आणि अक्षय आठवले अशी मारहाण करणा-या कैद्यांची नावे असून, वाल्मिक कराड यांनी आपल्याला एका खोट्या केसमध्ये अडकवल्याच्या रागातून ही मारहाण झाल्याची प्राथमिक माहिती आहे. या घटनेमुळे बीड जिल्हा कारागृहातील सुरक्षेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बीड जिल्हा कारागृहात वाल्मिक कराड आणि सुदर्शन घुले यांच्यावर महादेव गित्ते आणि अक्षय आठवले यांनी हल्ला चढवला. गित्ते आणि आठवले यांचा आरोप आहे की, वाल्मिक कराड यांच्यामुळे त्यांना एका खोट्या गुन्ह्यात गोवण्यात आले आहे. याच संतापातून त्यांनी कराड आणि त्यांच्यासोबत असलेल्या घुले यांना लक्ष्य केले. दोन–चार चापटा मारल्याचे सांगण्यात येत आहे, या घटनेची पुष्टी स्वतः आमदार सुरेश धस यांनी केली आहे. या घटनेनंतर आमदार सुरेश धस यांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

पान २ वर



आरंभ

बीड जिल्हा कारागृहामध्ये गँगवॉर घडण्याअगोदर "आका, बोका, खोका" यांना आर्थर रोडसह इतर जिल्ह्यातील कारागृहात हलवा!

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – १७६ ■ शनिवार दि.१५ मार्च २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रु. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 176 ■ Saturday Dt. 15 March 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

अजितदादा, जिल्ह्यात रक्तरंजित इतिहास घडवणाऱ्या 'आका, बोका, खोकांना' आर्थर रोडसह इतर कारागृहामध्ये हलवा

■ पालकमंत्री म्हणून अजितदादा तुम्हीच लक्ष घाला; गुन्हेगारांना शह देणाऱ्या आजी-माजी मंत्री आमदारांना धडा शिकवाच?
■ आका, बोका, खोकांना बीड जिल्हा कारागृहातून बाहेर निरोप पाठवायला सुविधा खुप सोपी आहे

बीड । प्रतिनिधी

## शिवाजीनगर पोलिसांची वेश्या व्यवसाय चालवणाऱ्या दोन आरोपींवर कारवाई

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह जवळील पत्र्याच्या शेडमध्ये दोन इसम वेश्या व्यवसाय चालवत असल्याची गोपनीय माहिती पोलीस निरीक्षक मारुती खेडकर यांना दि.२९ मार्च रोजी मिळाली होती. मिळालेली गोपनीय माहिती त्यांनी उपविभागीय अधिकारी विश्वंभर गोल्डे यांना दिली असता त्यांनी दिलेले आदेशानुसार पोलीस निरीक्षक मारुती खेडकर व पोलीस स्टेशन येथील पथकाने छापा मारून. वेश्याव्यवसाय चालवणारे आरोपी विशाल सुनील वाघमारे (वय २९ रा. अशोक नगर, बार्शी नाका बीड) शेख अख्तर उर्फ सलीम शेख महेमूद (वय ४६ रा. इंदिरानगर नाट्यगृह जवळ बीड) या दोघांना जागीच पकडून छत्रपती संभाजीनगर येथील दोन पिढीत महिलांची सुटका केली असून आरोपी यांना अटक करून न्यायालयात हजर केले असता त्यांना २ एप्रिल पर्यंत पोलीस कोठडी देण्यात आलेली आहे.




सदरची कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय अधिकारी विश्वंभर गोल्डे यांच्या आदेशानुसार पोलीस निरीक्षक मारुती खेडकर, सहा पोलीस निरीक्षक विशाल मोरे, महिला पोलीस उपनिरीक्षक नीता दामधर, पोलीस हवालदार गणेश परजने, पोलीस शिपाई भरत शेळके, महिला पोलीस शिपाई विशाखा वडमारे यांनी केली आहे.

# हिंदूच्या कानिफनाथ मंदिरात विटंबना हिरवा झेंडा फडकावला!

## गेवराई तालुक्यातील पाचेगावात अवमानजनक कृत्य

गेवराई । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात अनेक ठिकाणी दररोज धक्कादायक घटना घडत आहेत या दोन दिवसात हिंदू- मुस्लिम बांधवांचे दोन्हीही सण एकत्र आल्याने सलोखा निर्माण होईल असे देखील वाटले होते पण बीड जिल्हा सातत्याने गुन्हेगारीच्या मार्गावर प्रवेश करत आहे.

कालच गेवराई तालुक्यातील अर्धमसला गावात मज्जिद मध्ये स्फोट घडवून आणला होता मात्र गुढीपाडवा आणि रमजान ईद असल्यामुळे तेथील ग्रामस्थांनी सलोखा जोपासत तणावाचे वातावरण शांत केले होते आणि त्या ठिकाणी लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीमध्ये इफ्तार पार्टी करण्यात आली त्यातच आता पुन्हा गेवराई शहरापासून काही अंतरावर असलेले पाचेगाव येथे काही समाजकंटकांनी जाणीवपूर्वक मध्यरात्रीत कानिफनाथ मंदिरातील देवदेवांचे सामान बाजुला ठेऊन हिरव्या रंगाची चादर अंथरली होती, अशी प्राथमिक माहिती मिळाली आहे.

सविस्तर वृत्त असे की तमाम हिंदू बांधवांचे दैवत असणारे श्री.कानिफनाथ महाराज मंदिरात झालेल्या घटनेने खळबळ माजली या प्रकरणात तातडीने पोलीस प्रशासनाने तपासाला सुरुवात केली आहे घटनास्थळी पोलीस दलाचे प्रमुख दाखल झाले. कायदा आणि सुव्यवस्थेचा बोजवारा उडाला की काय अशी चर्चा आहे त्यामुळे त्यातच रमजान ईद चे कारण दाखवून गावात मोठ्या प्रमाणात पवित्र ईद निमित्त सजावट करायचे आहे असे कारण दाखवून तेथील समाजकंटकांनी थेट हिंदू धर्माच्या पवित्र भूमीत थेट हिरवे झेंडे लावले आणि भगवान श्री कानिफनाथ यांच्या समाधी जवळ हिरवी सादर टाकून सामाजिक सलोखा बिघडविण्याचा प्रयत्न

पान २ वर



# बीड जिल्ह्यात रमजान ईद मोठ्या उत्साहात साजरा



■ मुस्लिम बांधवांनी ईदचा आनंद घेऊन सामाजिक ऐक्याचा संदेश दिला

■ हिंदू मुस्लिम बांधवांचा एकमेकांचा गळाभेटीचा उत्सव






बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याच्या शहरी भागासोबत ग्रामीण भागात मुस्लिम समाजाचे प्राबल्य असून रमजान ईद मोठ्या उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीने साजरी करण्यात आली. रमजान महिन्यात रोजे ठेवून मुस्लिम बांधवांनी श्रद्धेने उपवास ठेवतात व अखेर चंद्रदर्शन झाल्यानंतर रमजान ईद साजरा करतात.

रमजान ईद या सणाला मुस्लिम धर्मात अनन्यसाधारण महत्व आहे. ज्याप्रमाणे हिंदू समाजात दिवाळी, ख्रिश्चन बांधव नाताळ हे सण साजरे करतात त्याप्रमाणे मुस्लिम समाजात रमजान ईद हा सण साजरा केला जातो. रमजान ईद सण आला की नवीन कपडे, सुगंधी अत्तर, शेरवानी कुर्ते, महिलांसाठी हिजाब आणि पारंपरिक पेहराव खरेदीसाठी बाजारपेठांमध्ये नागरिकांची मोठी गर्दी झालेली पाहायला मिळाली. त्याचबरोबर प्रत्येक घरामध्ये गोडधोड पदार्थांसाठीही तयारी करण्यात आली होती.

सोमवारी सकाळी, मुस्लिम बांधवांनी नवीन वस्त्र परिधान करून, अत्तर व सुरमा लावून मस्जिदमध्ये जाऊन सामूहिक नमाज अदा केली. नमाज पठणानंतर एकमेकांना गळाभेट देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. लहानग्यांपासून वृद्धांपर्यंत प्रत्येकाने या सणाचा आनंद लुटला. मुस्लिम समाजातील नागरिकांनी ईदचा आनंद घेऊन सामाजिक ऐक्याचा संदेश दिला. रमजान ईद सण हा केवळ धार्मिक नाही, तर बंधुभाव, प्रेम आणि सौहार्द वाढवण्याचा दिवस आहे. रमजान महिन्यात महिनाभर उपवास केल्यानंतर, ईदच्या दिवशी आनंदाने गोडधोड भोजन करून हा सण साजरा केला जातो.

# अंबाजोगाई भागात गुंडगिरी करणाऱ्या गुंडाची एमपीडीए कायद्यांतर्गत हर्सूल कारागृहात रवानगी

## पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत व जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांचा गुंडगिरी करणाऱ्याला दणका!

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी जिल्ह्याची धुरा सांभाळल्यापासून शर्थीचे प्रयत्न चालवले आहेत. त्यांना बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची खंबीर साथ लाभली आहे. बीड जिल्ह्यात गुंडागिरीचे व गुन्हेगारीचे तसेच वाळू माफियांचे समूळ उच्चाटन करण्याचा उदात्त दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून एमपीडीए कायद्यांतर्गत बऱ्याच गुन्हेगारांवर व गुंडांवर कारवाई केली आहे. त्या अनुषंगाने आंबेजोगाई शहर पोलीस स्टेशन येथे दि.०३-०२-२०२५ रोजी इसम नामे आर्यान नरेश मांदळे (वय २२, रा.बोधीघाट, ता.अंबाजोगाई,जि.बीड) यांच्याविरुद्ध एमपीडीए कायद्यांतर्गत स्थानबद्ध करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक यांच्या मार्फतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर केला होता.





सदर स्थानबद्ध इसमाविरुद्ध आंबेजोगाई पोलीस ठाण्यात जीवे मारण्याचा प्रयत्न करणे, दंगा करणे, गैरकादयाची मंडळी जमा करणे, दुखापत करणे, ओळखीचा फायदा घेऊन लुटणे, रस्ता अडविने, नुकसान करणे, जीवे मारण्याच्या धमक्या देणे, शिवीगाळ करणे, अवैध शास्त्र बाळगणे, दंडाधिकाऱ्यांच्या आदेशाचे उल्लंघन करणे, दगडफेक करणे अशा गंभीर स्वरूपाचे एकूण ११ गुन्ह्याची नोंद पोलीस अभिलेखावर आहे. सदरील इसम हा गंभीर स्वरूपाच्या गुन्हे करण्याच्या सवईचा असल्याने अंबाजोगाई पोलिसांची त्याच्यावर बऱ्याच दिवसापासून करडी नजर होती. तसेच सदर इसमाने आपले वर्तन सुधारावे म्हणून यापूर्वी कलम ५६(१) मपोका प्रमाणे दि.३१-०१-२०२३ रोजी व उीलि ११० प्रमाणे दि.१५-०६-२०२३ रोजी त्याच्यावर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती. परंतु सदर इसम हा प्रतिबंधक कारवाईस न जुमानता पुन्हा चढत्या क्रमाने गंभीर गुन्हे करण्याचे चालूच ठेवून होता. त्याची अंबाजोगाई शहरात व परिसात प्रचंड दहशत आहे त्याच्याविरुद्ध सर्वसामान्य लोक फिर्याद अथवा साक्ष देण्यासाठी समोर येत नाहीत तो सर्वसामान्य लोकांना व व्यापाऱ्यांना त्रास देऊन दहशत निर्माण करून गुन्हे करत होता.

त्याअनुषंगाने वरिष्ठांच्या आदेशानुसार बीडच्या स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उस्मान शेख यांनी तांबे पोलीस जमादार यांच्यामार्फत सदर इसमास दि.३०-०३-२०२५ रोजी बीड शहरात ताब्यात घेऊन आंबेजोगाई शहर पोलीस ठाण्यात हजर केले आहे. आंबेजोगाई शहर पोलीस ठाणे येथे सदर इसमास कायदेशीररित्या ताब्यात घेऊन योग्य पोलीस बंदोबस्तात हर्सूल कारागृह छत्रपती संभाजीनगर येथे स्थानबद्ध करणे करिता रवाना केले आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उस्मान शेख, पोनि.विनोद घोळवे, सपोनि निलंगेकर, पोह श्रीकृष्ण वडकर पांडुरंग काळे अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्याचे पोउपनि सुशांत सुतळी, अभिमन्यू औताडे, पोह बाळकृष्ण जायभाये, गणेश हंगे, पोह युनुस बागवान, बिबीपण चव्हाण नेमणूक स्थानिक गुन्हे शाखा बीड यांनी केलेली आहे.

# शेतकऱ्याचे भरदिवसा घर फोडले, नऊ लाखांचा ऐवज लंपास

गेवराई । प्रतिनिधी

घराला कुलूप बंद करुन शेतात काम करण्यास गेलेल्या गेवराईतील शेतक-याचे भरदिवसा घर फोडून आज्ञात चोरट्यांनी नऊ लाखाहून ऐवज लंपास केल्याची घटना काल दुपारी दोन वाजेच्या सुमारास घडली. मजुरांच्या तुटवडा जाणवत असल्याने ग्रामीण भागातील गावखेड्यातील शेतकरी कुटुंबिय शेतात राबत आहेत. काल शुक्रवारी सुर्डी बुद्रुक ता.गेवराई जि.बीड येथील रणजित तुकाराम सोळंके यांचे कुटुंबीय घर कुलूपबंद करुन शेतात काम करण्यासाठी गेलेले होते. याच संधीचा फायदा घेत आज्ञात चोरट्यांनी कुलुप तोडुन घरात प्रवेश करत भरदिवसा दोन वाजेच्या सुमारास घरफोडी करुन चार लाख रुपये रोख रक्कम तसेच आठ तोळे सोन्याचे दागिने असा जवळपास नऊ लाखाहून आधिक ऐवज लंपास केल्याची माहीती शेतक-याने दिली. दरम्यान शेतकरी रणजित सोळंके यांच्या घरी धाडसी चोरी झाल्याची माहीती तलवाडा यांना मिळताच सहायक पोलीस निरीक्षक सोमनाथ नरके,फौजदार स्वप्नील कोळी, पोलीस जमादार हनुमंत जावळे, विठ्ठल चव्हाण यांनी घटनास्थळावर दाखल होऊन पाहणी केली.ठसे (फिंगरफ्रीट)घेण्यात आले असून,आज दुपारनंतर किती ऐवज गेला शेतकरी यांच्या माहीतीवरुन गुन्हा दाखल करण्यात येईल असे पोलीसांनी सांगीतले. भरदिवसा घर फोडल्यच्या या धाडसी चोरीने ग्रामीण भागातील गावखेड्यातील शेतकरी कुटुंबियात भीतीयुक्त वातावरण निर्माण झाले आहे.

पान १ वरून...

## बीडच्या कारागृहात कराड, घुलेला गित्ते व आठवलेंकडून मारहाण?

त्यांनी सांगितले की, 'वाल्मिक कराड आणि सुदर्शन घुले यांना बीड कारागृहात मारहाण झाल्याची घटना खरी आहे. या दोघांच्या जीवाला आता कारागृहात धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे त्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने त्यांना तात्काळ बीड कारागृहातून नागपूर किंवा अमरावती येथील मध्यवर्ती कारागृहात हलवण्यात यावे, अशी मागणी आमदार धस यांनी केली आहे. यामुळे भविष्यात अशा घटना टाळता येतील आणि त्यांच्या जीविताला असलेला धोका कमी होईल, असे त्यांचे म्हणणे आहे.

विशेष म्हणजे, मारहाणीची घटना घडण्यापूर्वी वाल्मिक कराड, सुदर्शन घुले आणि दुसरीकडे महादेव गित्ते, अक्षय आठवले यांच्यात अनेकदा शाब्दिक चकमकी झाल्या होत्या, अशी माहिती समोर येत आहे. या दोन्ही गटांमधील तणाव आणि वैर कारागृह प्रशासनाला ज्ञात होते. असे असतानाही प्रशासनाने वेळीच योग्य ती खबरदारी का घेतली नाही, असा सवाल आता उपस्थित केला जात आहे. जर त्यांच्यातील वाद प्रशासनाला माहीत होता, तर त्यांना वेगवेगळ्या बॅरेकमध्ये का ठेवण्यात आले नाही किंवा त्यांच्यावर कडक नजर का ठेवण्यात आली नाही, याबद्दल प्रश्न विचारले जात आहेत. कारागृह प्रशासनाच्या संभाव्य हलगर्जीपणामुळेच ही गंभीर घटना घडल्याचा आरोपही केला जात आहे. या मारहाणीची तीव्रता किती होती, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. जर मारहाण किरकोळ असेल, तर कदाचित अंतर्गत चौकशी केली जाईल. मात्र, जर वाल्मिक कराड आणि सुदर्शन घुले यांना गंभीर दुखापत झाली असेल, तर त्यांना वैद्यकीय उपचारासाठी बीड येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले जाईल का?, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. एकंदरीत, बीड जिल्हा कारागृहात कैद्यांमध्ये झालेली ही मारहाणीची घटना अत्यंत गंभीर असून, यामुळे कारागृह प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तसेच याबाबत सायं. दैनिक महाराष्ट्र आरंभ ने मागील एका अंकात एक बातमी प्रकाशित केली होती की, बीडच्या कारागृहात गँगवॉर होण्याअगोदर कारागृहात असलेल्या आरोपींना इतर जिल्ह्यातील कारागृहात हलवा. त्या बातमीचा अंदाज खरा ठरला असून त्या बातमीप्रमाणेच आज बीडच्या कारागृहात ही घटना घडली आहे. यामुळे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा आता तरी सदरील घटना गांभीर्याने कारागृहातील आरोपींना इतर जिल्ह्यात हलवा. जेणेकरून आरोपींच्या एकमेकांच्या जीवाला धोका निर्माण होणार नाही.

## हिंदूच्या कानिफनाथ मंदिरात विटंबना हिरवा झेंडा फडकावला!

केला गुन्हेगारी चे धाडस वाढल्याने अशा गोष्टी घडत असल्याची माहिति मिळतेय हिंदू मुस्लिम वाद निर्माण करत दंगल घडवण्याचा कट रचला जातो का ? काही नागरिकांकडून बोलले जात आहे. या घटनेमुळे एसपी नवनीत कावत क्शन मोडवर येऊन गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे सणासुदीच्या काळात बीड जिल्ह्यात लागलेले गुन्हेगारीचे ग्रहण उपमुख्यमंत्री व पालकमंत्री अजित पवार थांबवणार का अशी मागणी होत आहे.




तेजस अर्बन को-ऑपरेटिव क्रेडिट सोसायटी लिमिटेड बीड च्या वतीने आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ निमित्ताने आज पाणपोई व बाकडे वाटप उद्घाटन सहकार अधिकारी श्री सांगुळे एस एस व दैनिक प्रजापत्राचे संपादक संजय मालानी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ॲड प्रकाश दादा कवठेकर, सचिव रामदास ठोसर सर, पोलीस अधिकारी श्री पवार, संस्थेचे अधिकारी सचिन घिगे, अविनाश मोरे, व्यापारी श्री शेख इकबाल शेख करीम सह आदी उपस्थित होते.

# शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढून घ्यावेत : तहसीलदार

## ढेकणमोहा, घाटसावळी ग्राहक सेवा केंद्रास भेट

बीड । प्रतिनिधी

शासनाच्या विविध योजनांचा लाभ शेतकऱ्यांना जलद व पारदर्शक पद्धतीने देणे सुलभव्हावे, यासाठी केंद्र सरकारने १४ ऑक्टोबर २०२४ पासून महाराष्ट्रासह २४ राज्यांमध्ये अॅग्रीस्टॅक योजना राबविण्यास सुरुवात केली आहे. शेतकऱ्यांची आधार क्रमांकाशी संलग्न माहिती एकत्रित करून त्यांना विशिष्ट ओळख क्रमांक देणे, केंद्र व राज्य शासनाच्या कृषी योजनांचा त्वरित लाभ मिळवून देणे, हा या योजनेचा उद्देश आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपले फार्मर आयडी काढून घ्यावेत असे आवाहन तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी केले.



घाटसावळी वा ढेकणमोहा येथे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी शनिवारी सीएससी केंद्रावर भेट दिली व उर्वरित शेतकरी यांनी दोन दिवसात फार्मर आयडी काढून घेण्याचे आवाहन यावेळी केले. जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी बीडच्या विकासासाठी अनेक योजनांचा धडाक्याने पाठपुरावा सुरू केला आहे त्यांच्या सूचनेनुसार तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी ही भेट दिली. बीडचे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी हे सर्व तहसीलदार यांचा अॅग्रीस्टैंक कामकाजाचा, प्रलंबित फेरफार, वसुली विषयक बाबींचा आढावा घेत असतात. अंग्रीस्टैंक योजनेत शेतकऱ्यांना मिळणाऱ्या ओळखपत्रामुळे अनेक फायदे होणार आहेत. यात प्रामुख्याने प्रधानमंत्री सन्मान निधी योजनेचा लाभ अधिक जलद व सुलभ होईल. शेतकऱ्याऱ्यांना कर्ज प्रक्रिया वेगवान होईल आणि शेतीविकासासाठी अधिक सहाय्य मिळेल, बाजारपेठेपर्यंत अधिक सुलभप्रवेश मिळेल, सरकारी कार्यालयांना वारंवार भेटी न देता डिजिटल सेवांचा लाभ घेता येईल, नव्या योजनांची माहिती तात्काळ मिळेल, शेतकऱ्यांचे पीक विमा तसेच आपत्ती व्यवस्थापनांतर्गत नुकसान भरपाईसाठी सर्वेक्षण सूलभहोईल, असेही त्यांनी यावेळी सांगीतले.

# पारंपरिक शेती ऐवजी फुलशेती करत फुलवला समृद्धीचा मळा

लिंबागणेश | प्रतिनिधी

बीड तालुक्यातील मुळुकवाडी येथील शेतकरी चंद्रसेन शेषेराव ढास या शेतकरी कुटुंबाने पारंपरिक पिकांऐवजी फुलाची शेती करत समृद्धीचा मळा फुलवला आहे. साधारणतः १००० लोकसंख्या असलेल्या मुळुकवाडी गावातील शेतकरी प्रामुख्याने कांदा पिक घेतात. संपुर्ण लिंबागणेश पंचक्रोशीत एकमेव फुलशेती करणारे शेतकरी म्हणून चंद्रसेन ढास यांची ओळख आहे. १२ वर्षांपूर्वी मुळुकवाडी येथील १० शेतकऱ्यांनी एकत्र येऊन गुलाब फुलांची गटशेती करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर केवळ चंद्रसेन ढास यांनीच फुलशेती व्यावसाय तग धरून जिद्दीने करत आहेत. सकाळी उठून कळी तोडली तरच २ दिवस ती टिकते त्यामुळे यासाठी घरचे मजुर असणे गरजेचे आहे. चंद्रसेन ढास यांना ५ एक्कर शेती असुन त्यापैकी ३ एक्कर शेतात फुलशेती करतात. फुलांना योग्य दर मिळण्यासाठी लागवड ऐन उन्हाळ्यात म्हणजे पाणी टंचाईच्या




काळात करावी लागते. पावसाळा सुरू असताना उत्पादन निघण्यास सुरूवात होत असल्याने अनेकदा कमी जास्त पावसाचा फटका फुलशेतीस बसतो मात्र अस्मानी सुलतानीचा विचार न करता जोखीम पत्करून फुलशेती करतात. फुलांना श्रावणात, गणेशोत्सवात तसेच नवरात्रोत्सवात मोठ्या प्रमाणावर मागणी असते. फुलांचे बाजारभाव स्थिर नसतात. गुलाब, गलांडा, गुलछडी, बिजली, अश्टर, झेंडु, शेवंती आद फुलांचे उत्पादन करण्यात येते. बीड, केज, पाटोदा याठिकाणी फुले विक्रीसाठी पाठवली जातात. चंद्रसेन ढास यांच्या पत्नी सविता ढास, मुलगा प्रणव ढास, अथर्व ढास फुलशेतीत मदत करतात. मोठा मुलगा प्रणव ढास यांने पुणे येथे इव्हेंट मॅनेजमेंट कोर्स केलेला आहे तर अर्थव शिक्षण घेत आहे. लिंबागणेश पंचक्रोशीतील शेतकरी फुल सेंटर प्रसिद्ध असुन धार्मिक, लग्न समारंभ, वाढदिवस विविध कार्यक्रमांसाठी आवश्यक हारांसाठी चंद्रसेन ढास यांच्याकडे मागणी असते.

**आपल्या भागात फुलशेती नाही म्हणत कृषी विभागाने दोनदा दाखल केलेली फाईल रद्दबातल केली : चंद्रसेन ढास**

शेतकऱ्यांना फुलशेती मध्ये चांगले उत्पन्न मिळू लागले आहे. शेतकऱ्यांनी योजनेचा लाभ घेऊन फुलशेती मध्ये प्रगती करावी यासाठी शासनाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत फळबाग, वनपिके, मसाला पिके व फुलशेती आदींसाठी १ वर्षं ते ३ वर्षं अनुदान तत्वावर शासकीय योजना कार्यान्वित आहे. मात्र बीड कृषी विभागाची अनास्था यास कारणीभूत असुन दोन वेळा केलेली फाईल त्यांनी आपल्या भागात फुलशेती नसल्याने नाकारली असल्याची खंत चंद्रसेन ढास यांनी बोलून दाखवली.



# चौसाळा येथे भव्य कुस्त्यांच्या दंगली

## जिल्हाप्रमुख गणेश वरेकर व तालुकाप्रमुख गोरख सिंघन यांच्या हस्ते लावली मानाची कुस्ती

बीड | प्रतिनिधी

बीड तालुक्यातील चौसाळा येथे सालाबादप्रमाणे यंदाही सैलानी बाबाच्या ऊरुषनिमताने भव्य कुस्ती आखाडा भरवण्यात आला होता. जिल्हातुन व बाहेर जिल्ह्यातील मल्ल यामध्ये सामील झाले होते. ११रु. पासून १०००१ रु. च्या कुस्त्या लावण्यात आल्या. शेवटी मानाची कुस्ती शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर व माझ्या हस्ते लावण्यात आली.

यावेळी बोलताना वरेकर म्हणाले की, कुस्ती हा खेळ मर्दानी असुन त्याला राजाश्रय मिळाला पाहिजे, नवयुवकांनी व्यसनाच्या आहारी न जाता नियमित व्यायाम करुन कुस्ती सारख्या खेळाकडे वळले पाहिजे ज्यामुळे विविध शासकीय नोकरीमध्ये संधी मिळते व जीवन सार्थकी लागते.

यावेळी गावकऱ्यांच्या वतीने मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यावेळी वस्ताद बाळु आवारे, वस्ताद तात्यासाहेब बहिर, वस्ताद बंडु कदम, युवा नेते विशाल सोनवणे यांच्यासह परिसरातील लोक व कुस्ती शौकीन मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्वास क्रिटिकेअर हॉस्पिटलचे मोठ्या उत्साहात भव्य वास्तूत स्थलांतर

हिंगोली | प्रतिनिधी

हिंगोली शहरातील प्रसिद्ध बालरोग तज्ञ डॉ. स्वप्नील गिरी यांच्या श्वास क्रिटीकेअर (नवजात शिशु व बाल अतिदक्षता विभाग) हॉस्पिटलचे उद्घाटन रविवारी दिनांक ३० मार्च रोजी गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर गांगलवाडी संस्थांनचे महंत आत्मानंद गिरी महाराज यांच्या शुभहस्ते फित कापून व विधीवत पूजा डॉ स्वप्निल गिरी व त्यांच्या पत्नी रचीता गिरी यांच्या हस्ते करून एनटीसी भागातील कोथळज रोडवरील सह्याद्री हॉस्पिटल समोरील नव्या भव्य वास्तूमध्ये स्थलांतर करण्यात आले.

श्वास क्रिटीकेअर हॉस्पिटलचे उद्घाटन ३० मार्च रोजी फित कापून उद्घाटन झाल्यानंतर त्या ठिकाणी उद्घाटन कार्यक्रम झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार तानाजीराव मुटकुळे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे हिंगोली जिल्हाध्यक्ष बिडी बांगर, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, माजी नगराध्यक्ष दिलीपराव चव्हाण भाजपा युवा नेते शशिकांत रामरावजी वडकुते,

अभिषेक नाईक, आय एम चे उपाध्यक्ष डॉ दीपक डोणेकर, आय एम चे माजी अध्यक्ष डॉ सचिन बगडीया, आय एम चे माजी माजी सचिव तथा सह्याद्री हॉस्पिटल चे संचालक डॉक्टर यशवंतराव पवार, वैद्यकिय सेलचे शिवसेना जिल्हाप्रमुख डॉक्टर शिवाजी गीते डॉक्टर दामोदर बिरगड श्वास फार्मसी व गुरुमाऊली एजन्सी चे संचालक गणेश गरड, दिवाकर माने, रवींद्र वाढे, ड.सुनिल भुक्तर, प्रितम सरकटे, नम्रता एजन्सी चे शुभम देशमुख,पिंपळदरी चे सरपंच शिंदे ,मिरटकर यांची उपस्थिती होती.

यावेळी सर्वप्रथम श्वास हॉस्पिटलच्या वतीने उपस्थित मान्यवरांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला तसेच यावेळी प्रमुख पाहुण्यांनी डॉक्टर स्वप्नील गिरी यांच्या नवीन वस्तू उद्घाटन स्थलांतर भवन व त्यांच्या केलेल्या कार्यची स्तुती तर गुरुमाऊली एजन्सी अँड मेडिकलचे संचालक गणेश गरड यांनी आपल्या आपल्या प्रास्ताविक भाषणात डॉक्टर स्वप्नील गिरी यांनी आपल्या शैक्षणिक जीवनापासून ते सदरील नवीन वस्तूतील हॉस्पिटलपर्यंतचा आढावा घेतला.

यावेळी डॉक्टर स्वप्निल गिरी यांनी आपल्या समारोपि भाषणात उपस्थित सर्वांचे आभार मानून या ठिकाणी आपल्या वैद्यकीय क्षेत्रातील कार्यकाळाची सखोल माहिती सांगून अगदी छोट्याशा ग्रामीण भागातून आलेल्या आपल्या अनेक खडतर प्रवासाबाबत माहिती देऊन अनेक बालकांना गंभीर आजारासाठी नांदेडला जावे लागत होते. आता त्या सर्व सुविधा आपल्याच हॉस्पिटलमध्ये उपलब्ध करून दिले असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले तसेच सर्व उपस्थितयांचे आभार मानले. यावेळी श्वास फार्मसी व गुरुमाऊली एजन्सी अँड मेडिकलचे संचालक गणेश गरड, अशोकराव खूनकर, अमोल गिरी, मनोहर गिरी, आशिष पर्वत,रामेश्वर गिरी, आर्कि रचिता गिरी, स्वराली गिरी, डॉ. स्वप्नील गिरी यांच्या सह अनेकांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा किशोर इंगोले तर आभार प्रदर्शन डॉ. स्वप्नील गिरी आणि त्यांच्या पत्नी आर्कि रचिता गिरी यांनी मानले.



कडा : येथे रमजान ईद निमित्त सरपंच युवराज पाटील, उपसरपंच दिपक कर्डिले, मा.उपसरपंच बाळासाहेब कर्डिले, ग्रा.प.सदस्य बिपिनशेठ भंडारी, कडा पोलीस चौकीचे नरवडे साहेब सह आदी मान्यवरांनी मुस्लिम बांधवाना गुलाबाचे फुले देऊन ईद च्या शुभेच्छा दिल्या.

# धरण तुडूंब तरीही दहा दिवसाला मिळते पाणी

अंबाजोगाई | प्रतिनिधी

शहराला पाणिपुरवठा करणारे मांजरा धरण, काळवटी तलाव तुडूंब भरला आहे. तरीही शहराला १० दिवसाला पाणीपुरवठा सुरु आसल्याचे चित्र सध्या शहरात पाहिला मिळत आहे. नगरपालिका प्रशासणाने गांभीर्याने घेऊन ४ दिवसाला नळ योजनेला पाणी सोडण्याची मागणी शहरवासी करत आहेत.

शहराला पाणीपुरवठा करणारी जलवाहीनी मांजरा व काळवटी धरण परतीच्या पावसात तुडूंब भरले आहेत. त्यामुळे सुरळीत व नियमीत पाणीपुरवठा होईल अशी आशा शहरातील नागरिकांना होती. नगरपालिका प्रशासणाने शहराला पावसाळ्यात ७ ते ८ दिवसाला तर भर उन्हाळ्यात १०, ते १२ दिवसाला पाणी पुरवठा करत आहे. उन्हाळ्यात सर्वाधिक पाण्याचा वापर केला जातो. पण नळ योजनेला वेळेवर पाणी पुरवठा होत नसल्यामुळे शहरात पाण्याची दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. १०, ते १२ दिवसाला होणारा पाणी पुरवठा दूषित व पिवळ्या रंगाचा पाणी पुरवठा होत आहे. नगर पालिका प्रशासनाकडे कोट्यावधीची जलशुद्धीकरण यंत्रणा आहे पण तिही कुचकामी ठरत आसल्याने पिवळ्या रंगाच्या पाण्यावर शहरवासीयांना घसा ओला करावा लागत आहे.

# भावाच्या आत्महत्या प्रकरणी गुन्हा दाखल असलेल्या स्वप्निल (उर्फ) बबलू देशमुखाचा दगडाने ठेचून खून

सिरसाळा | प्रतिनिधी

काल सणासुदीच्या वेळी सिरसाळा पासून काही अंतरावर असलेल्या कानपूर मध्ये संध्याकाळी पाचच्या सुमारास घटना घडली. धारूर तालुक्यातील काना पूर येथे शनिवारी सायंकाळच्या सुमारास एक या हृदयवद्रक घटनेत स्वप्निल (उर्फ) बबलू देशमुख (वय अंदाजे २७) यांची निर्गुण हत्या करण्यात आली. त्यांना अज्ञात हल्लेखोरांनी दगडाने ठेचून मारले. धक्कादायक बाब म्हणजे. दोन वर्षांपूर्वी पहा याच स्वप्निलच्या मानसिक त्रासाला कंटाळून गावातील किराणा दुकानदार यांचा अविनाश देशमुख यांनी २३ मार्च २०२३ रोजी आत्महत्या केली. याप्रकरणी स्वप्निल देशमुख वर गुन्हा दाखल होता आणि याच गुन्ह्यावरून गावात तणावाचे वातावरण होते.



या हल्ल्यात आत्महत्या केलेल्या अविनाश चा भाऊ संतोष देशमुख आणि त्याची पत्नी सोनाली देशमुख हे देखील गंभीर जखमी झाले असून त्यांच्या शरीरावर तीक्ष्ण हत्याराने वार करण्यात आले आहेत.

विशेष म्हणजे. अविनाश देशमुख यांनी ज्या लिंबाच्या झाडाखाली आत्महत्या केली होती. त्याच झाडाखाली त्यात स्वप्नील देशमुख ची हत्या झाल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. शनिवारी संध्याकाळी पाच वाजेच्या सुमाराची खळबळजण घटना घडली. दोन वर्षांपूर्वीची दाखल असलेल्या गुन्ह्यामुळे गावात आधीच कडुता होती. मिळालेल्या माहितीनुसार. संतोष देशमुख यांच्यावर स्वप्निल उर्फ बबलू देशमुख वारंवार गुन्हा मागे घेण्यासाठी दबाव टाकत होते. याच पार्श्वभूमीवर ही घटना झाली असावी, असा संशय व्यक्त केला जात आहे.

स्वप्निल चा दगडाने हल्ला चढवला. ज्या त्यांच्या जागीच मृत्यू झाला. या झटापटी संतोष देशमुख आणि त्यांची पत्नी सोनाली देशमुख हे देखील गंभीर जखमी झाले. त्यांच्या शरीरावर गुप्ती सारखा धारदार हत्याराने वार असल्याचे प्रत्येकदर्शनी सांगितले. घटनास्थळावरून ती गुप्ती बरामत करण्यात आली असल्याची माहिती मिळत आहे. या घटनेनंतर गावात एकच आक्रोश पायाला मिळाला. संपत ग्रामस्थांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली होती. दरम्यान. नंतर संतोष देशमुख आणि त्यांची पत्नी सोनाली देशमुख स्वतःहून सिरसाळा पोलीस स्टेशन येथे हजर झाले. सोनाली देशमुख यांनी मयत स्वप्निल देशमुख यांच्या विरोधात पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

ज्या लिंबाच्या झाडाखाली अविनाश देशमुख यांनी गळफास घेतला होता. त्याच ठिकाणी स्वप्निल ची हत्या झाल्याने गावकऱ्यांमध्ये भेटीचे आणि आश्चर्य यांचे मिश्रण पाहायला मिळत आहे. या घटनेमुळे संपूर्ण कान्नापूर सुन्न झाले असून. दोन वर्ष पूर्वीच्या आत्महत्येच्या घटनेची आणि आत्ताच्या खुनाची चर्चा प्रत्येक घरात सुरू आहे. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी थांब घेऊन पंचनामा केला असून तपास सुरू केला आहे. या हत्याकांडामधील नेमके कारण काय. याचा शोध सिरसाळा पोलीस हे करीत आहेत.

## राष्ट्रभक्त, दूर्गसेवक, शिवपाईक जागर प्रतिष्ठान चे कर्तव्यदक्ष अध्यक्ष किसन पाटील चव्हाण

# जागर प्रतिष्ठानच्या माध्यमातून महाराष्ट्रात अनेक युवक सक्रिय

बीड प्रतिनिधी

किसन पाटील चव्हाण हे नाव गेल्या काही वर्षांपासून मराठवाड्यासह महाराष्ट्राच्या बहुतांश भागात चर्चेत असणार नाव जालना जिल्ह्यातील पांगरी येथील सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या किसन दादांनी गेल्या चार वर्षांपूर्वी जागर प्रतिष्ठान ची स्थापना करून सामाजिक जीवनाला सुरुवात केली सुरुवातीला बीड जालना भागात गडकिल्ले संवर्धन मोहिमा राबवल्या आणि हळूहळू प्रतिसाद वाढत गेला आज घडीला महाराष्ट्रातल्या पंधरा हून अधिक जिल्ह्यात जागर प्रतिष्ठान सक्रिय पने कार्यरत आहे.

गेल्या पाच वर्षांपासून किसन दादांच्या नेतृत्वाखाली जागर प्रतिष्ठानच्या वतीने बीड जिल्ह्यातील ऐतिहासिक शहर असणाऱ्या धारूर येथील किल्ल्यात पहिला दिवा माझ्या राजाला उपक्रमाअंतर्गत भव्य दीपोत्सव सोहळा साजरा केला जातो दीपोत्सवाची ही परंपरा अखंड सुरू ठेवण्याचा शब्द दादांनी गतवर्षीच्या सोहळ्यात दिला आहे.

आज पर्यंत जागर प्रतिष्ठानच्या माध्यमातून दोनशेहून अधिक स्वच्छता मोहिमा राबवल्या गेल्या आहेत, किसन दादांच्या नेतृत्वाखाली जागर प्रतिष्ठान च म्हणजेच छत्रपती शिवाजी महाराजांवर प्रेम करणाऱ्या शिलेदारांच मोठ जाळं महाराष्ट्रात पसरलं आहे. दुर्गसंवर्धन सोबतच आजच्या तरुण पिढीला शिवशंभू महाराजांचा इतिहास समजून सांगण्याचा दादांचा कायमच प्रयत्न असतो. यातूनच व्यसनमुक्ती शिबिर आयोजित करण्यात आली आहेत तसेच जागर प्रतिष्ठान च्या माध्यमांतून आजवर विविध ठिकाणाहून दीड हजार हून अधिक लोकांनी रक्तदान केलेल आहे रुग्णसेवेचा ही प्रयत्न सुरूच असतो.

स्त्री ही स्वराज्याची देवता आहे ही महाराजांची शिकवण दादांनी अंगिकारली आहे म्हणून माझ्या सारख्या असंख्य बहिणी आज दादांच्या सोबत आहेत ,दादांनी माझ्या सारख्या सर्वच बहिणीसाठी बऱ्याच ठिकाणी महिलांसाठी स्व रक्षण प्रशिक्षण शिबिर आयोजित केलेले आहेत. सोबतच पूरग्रस्त दुष्काळग्रस्त भागात जागर



प्रतिष्ठान च्या वतीने कायमच मदत करण्यात येत असते. समाजसेवा दूर्गसेवा रुग्णसेवा अशा अनेक सामाजिक उपक्रम राबवून शिव विचार जिवंत ठेवणाऱ्या हजारो शिलेदारांच जाळं दादांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात काम करत आहे, बीडच्या छोट्या भागातून सुरू झालेलं जागर च नाव आज महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहचलं आहे ही दादांच्या निस्वार्थ कामाची पावती आहे शिवरायांच्या विचारांचा जागर करणारा गोंधळी म्हणजेच रायगडाचा लेक किसन दादा कारण अस की जागर प्रतिष्ठान मध्ये आठरा पगड जातीचे सहकारी दादांच्या खांद्याला खांदा लावून काम करतात एकमेका साहाय्य करू अवघे धरू सुपंथ हा विचार जागर प्रतिष्ठान महाराष्ट्र भर पेरत आहे. गेल्या दोन वर्षांपासून धारूर येथे दादांच्या नेतृत्वाखाली जागर प्रतिष्ठान च्या माध्यमांतून छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा मोठ्या उत्साहात साजरा केला जातो तसेच गेल्या चार वर्षांपासून जागर प्रतिष्ठान चे असंख्य शिलेदार रायगडावर राज्याभिषेक सोहळ्याला जाऊन तिथे होईल ती सेवा महाराजांच्या चरणी अर्पण करतात.

महाराष्ट्रातल्या प्रत्येक गडकिल्ल्यावर स्वराज्य ध्वज उभारण्याचा दादांचा मानस आहे तसेच धारूर व तामसा येथे नेताजी पालकर यांच्या स्मारकासाठी दादा कायमच पाठपुरावा करत आहेत. येणाऱ्या काळात जागर प्रतिष्ठान महाराष्ट्रातील तरुणाईला नक्कीच एका वेगळ्याच मार्गावर घेऊन जाणार आणि युवशक्तीची ही ताकद राष्ट्राच्या हितासाठी उपयोगी आणून शिवचरणी सेवा रुजू करत राहील यात शंका नाही किसन दादांच्या रोखठोक निर्भिड अन् स्पष्ठ भूमिकेमुळे युवकांच्या मनात त्यांचे आदराचे स्थान आहे. गडकिल्ल्यांच्या विषयी त्यांच्या मनात असलेला निस्वार्थ सेवाभाव आम्ही जवळून अनुभवला आहे या सच्चा शिवपाईकला तुम्ही आम्ही साथ आणि ताकद देणं खरच गरजेचं आहे नक्कीच महाराष्ट्राच्या पटलावर किसन दादांच्या रूपाने एक युवा चेहरा उदयाला येतो आहे आणि येणाऱ्या काळात किसन पाटील हे नाव निर्णायक ठरणार यात शंकाच नाही. अशा या गरिबाच्या लेकराणे छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरणी सेवा रुजू करण्यासाठी सुरू केलेला जागरचा महारथ असच घोडदौड करत रहो याच या बहिणीकडून शुभेच्छा...!

**लेखिका – प्रीती टेकाळे**
**(गेवराई)**
**(लेखिका,व्याख्याता, कवियात्री)**

# 'गेवराई तहसील' बनले दबंगांचा अड्डा निराधारांचा केला त्यांनी खड्डा!

## संजय गांधी विभागातील कर्मचाऱ्यांना समजते केवळ पैशांची भाषा?



आडे-मुद्दा क्रॉस

गेवराई तहसील कार्यालयातील मिलीजुली कर्मचाऱ्यांकडे वरिष्ठ अधिकारी कानाडोळा करीत आहेत. या रॅकेटमुळे सर्वसामान्यांची लुबाडणूक मात्र होत आहे. कार्यालयात लाच दिल्याशिवाय कोणतेही काम होत नसल्याने सामान्यांना जीव नकोसा झाला आहे. मदतनीस नावाचे 'कंत्राटी वळू'
फुकट पोसले जाणारे डझनभर 'गणू म्हणून मदतनीस' कार्यालयात वावरत आहेत. त्यांच्या माध्यमातून कार्यालयातील दलालांचे रॅकेट सक्रिय आहे. आश्चर्याची बाब म्हणजे, यात पाच ते सहा महिलांचाही समावेश असल्याची चर्चा रंगत आहे. शिकार शोधून भोळ्याभाबड्या नागरिकांना अडवायचे व त्यांच्याकडून पैसे उकळायचे, असे प्रकार वाढल्याच्या तक्रारी दिवसेंदिवस वाढत आहेत. दलालांचे वर्तुळ विस्तारत आहे. दलालांना कार्यालयातील अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांचा 'आशीर्वाद' लाभतोय.




प्रशासन स्तरावर रखडलेले काम करून देतो, असे आमिष त्यांना दाखविले जाते. रेशन कार्ड, संजय गांधी योजनेचे काम, दाखले, परवाने नूतनीकरण, नकला, उतारे आदी कामांसंदर्भातील काम दलालांमार्फत तातडीने होत आहे. कंत्राटी कर्मचाऱ्यांना समजते केवळ पैशांची भाषा, कार्यालयात शासकीय नियमांची पायमल्ली केली जात आहे. एखादे काम रखडले असताना केवळ पैशांची भाषाच अधिकारी व कर्मचाऱ्यांना समजते. आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता न करताच विविध योजनांचा लाभ नागरिकांना मिळवून दिला जातो. शिधापत्रिकेसाठी दलालांना ७०० ते १००० रुपयांपर्यंत व निराधार योजनेसारख्या कामांकरिता १००० ते २००० रूपये दिले म्हणजे काम झालेच म्हणून समजा. असे चित्र पाहायला मिळते. या गणू नावाच्या कर्मचाऱ्यांनी 'दबंगगिरी' करत आहेत. एखाद्या कागदाची पूर्तता न केल्यास काही कर्मचारी तर चक्क 'दबंगगिरी' करतात. प्रकरणाची कागदपत्रे ते हवेत भिरकावून त्रागा करतात. अखेर कंटाळून नागरिकांना दलालांच्या मार्गाने जायला ते भाग पाडतात. योग्यरित्या माहिती दिली जात नाही. दलालालांमार्फत हे काम केल्यास काही वेळातच कागदपत्रं हाती पडतात. लाचेच्या हिस्सेवाटणीवरून नुकतीच कर्मचाऱ्यांमध्ये शाब्दीक बाचाबाचीही झाली. देखील हे प्रकरण घडले असल्याचीही चर्चा आहे. शासकीय कामकाजात हस्तक्षेप, नागरिकांना आमिष दाखवून त्यांची आर्थिक लूट करणे हा कायद्याने गुन्हाच आहे. गोरगरीब, नवखे नागरिक प्रशासनाच्या भिडस्तपणाला बळी पडतात. नोकरशाही पुढे चांगले चांगले गुडघे टेकवतात आणि अखेर दलालांचाच मार्ग अनेकांना पत्करावा लागतो. बऱ्याण जणांना तहसील कार्यालयातील रांगेत उभे राहणे पसंत नाही. अनेकांकडे एवढा वेळ नसतो. काम होईलच याची अनेकांना खात्री नसते. त्यामुळे लोक दलालांमार्फत काम करून घेतात. अशी दुर्दैवाने वेळ लाभार्थ्यावर आली नागरिकांनी सुद्धा दलालांकडे न जाता स्वत: काम करावे. दलालांच्या भुलथापांमुळे आर्थिक फसगत मोठी होते. सर्वसामान्यांना समजून घेणे अपेक्षित आहे. सर्वांना योग्यरित्या माहिती मिळावी यासाठी तहसील प्रशासनाने प्रयत्न करावे अशी मागणी होत आहे.

## बसच्या धडकेत एकाचा मृत्यू

आष्टी । प्रतिनिधी
भरधाव बसने दिलेल्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. ही घटना धानोरा येथील रेल्वे ब्रीज येथे २६ मार्च रोजी घडली. मच्छिद्र कदम यांचा मुलगा अशोक हा आष्टी तालुक्यातील कडा येथे येत असताना बस (क्र.एम. एच. १४ बी टी ४११६) चालकाने त्याच्या दुचाकीला धडक दिली.
यामध्ये तो गंभीररित्या जखमी झाला. याप्रकरणी मच्छिद्र कदम यांच्या फिर्यादीवरून अंभोरा पोलीस ठाण्यात बस चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे, घटनेचा अधिक तपास पोहे गर्जे हे करत आहेत.

## गुढीपाडवा रमजान महिना अंधारात

### टाकरवणमध्ये नागरिकांचे प्रचंड हाल, मागील एक महिन्यापासून विजेचा लपंडाव

टाकरवण । प्रतिनिधी
माजलगाव तालुक्यातील टाकरवणमध्ये मागील एक महिन्यापासून विजेचा लपंडाव सुरू आहे. परिणामी शेतकरी व्यावसायिक घरगुती ग्राहक त्रस्त झाले आहेत. तर दिवसात शेकडो वेळा विजेचा लपंडाव सुरू असल्याने संपूर्ण रमजान महिना व गुढीपाडवा अंधारात गेला आहे.
तालुक्यातील टाकरवन हे पंधरा हजार लोकसंख्येचे गाव आहे. गावाला वीज पुरवठा करण्यासाठी ३३ के व्ही विज उपकेंद्र आहे. मात्र मागील एक महिन्यापासून दिवसात शेकडो वेळा वीज पुरवठा खंडित होत आहे. विज गेल्यास एक दोन घंटे येत नसल्याने शेतकरी नागरिक व्यवसायिकांचे प्रचंड हाल होत आहेत. सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने नागरिकांची लाहीलाही होत असताना सुद्धा महावितरण वीजपुरवठा करण्यास अपयशी ठरत असल्याचे उदाहरण टाकरवन मध्ये पाहायला मिळत आहे. रमजान महिना संपत आला असून संपूर्ण रमजान महिन्यांमध्ये विजेच्या लपंडावामुळे मुस्लिम बांधवांचे प्रचंड हाल झाले आहेत. गुढीपाडव्याच्या सणा दिवशी देखील दिवसभर वीज नसल्याचे चित्र दिसून आले. उन्हाळ्याचे दिवस असून पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे अशात गावातून गेलेल्या उजव्या कालव्यात पाणी आले असून. वीज पुरवठा सुरळीत नसल्यामुळे शेताला पाणी देण्यास प्रचंड अडचणी येत असून शेतकऱ्याचे पीकही संकटात सापडले आहे. टाकरवनकरांना २४ तासातुन चार तासही विज मिळत नाही. शेकडो वेळा विज गुल होते. या गंभीर प्रश्नाकडे महावीतरन कडे विचारना केल्यास ओव्हरलोड चे कारण सांगितले जाते. महावितरण विभाग लोकप्रतिनिधी प्रशासन लक्ष कधी घालणार आणि टाकरवनकरांचे हाल कधी थांबणार असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

> "मागील महिन्यापासून विजेचा लपंडाव सुरू आहे अधिकाऱ्यांना फोन लावल्यास उडवा ऊडवीची उत्तरे देतात. संपूर्ण रमजान महिन्यात चांगली वीज मिळाली नसल्याने मुस्लिम बांधवांचे हाल झाले शेतकऱ्यांचे हाल होत आहेत. विजेचा प्रश्न गंभीर बनल्याने टाकरवन करांचे हाल होत आहेत. प्रश्न न सुटल्यास तीव्र आंदोलन उभारणार.
> – सुनिल तौर, सरपंच टाकरवण



## अर्धमसला मशिदीतील स्फोट प्रकरण; दोषींवर कारवाई व चौकशी करा : शेख इमरोज शरीफ

बीड । प्रतिनिधी
गेवराई तालुक्यातील अर्धमसला येथील मशिदीत समाजकंटकांनी जिलेटिनचा वापर करून स्फोट घडवून आणल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या गंभीर घटनेचा मी, आझाद पत्रकार शेख इमरोज शरीफ, तीव्र निषेध व्यक्त करतो आणि प्रशासनाकडे दोषींवर कठोर कारवाईची मागणी करतो.



ही घटना रमजानच्या पवित्र महिन्यात आणि गुढीपाडव्याच्या दिवशी घडवून आणल्याने यामागे एक मोठा कट असल्याचा संशय आहे. दोन आरोपींना अटक करण्यात आली असली तरी या कटात आणखी कोण सामील आहे, हे शोधून काढण्यासाठी सखोल आणि निष्पक्ष चौकशी होणे गरजेचे आहे. या समाजविघातक प्रवृत्तींचा नायनाट करण्यासाठी प्रशासनाने तातडीने कठोर कारवाई करावी. म्हणूनच, मी मागणी करतो की या गुन्हेगारांच्या घरांवर बुलडोझर चालवण्यात यावा आणि त्यांच्यावर कठोरात कठोर कारवाई केली जावी.
तसेच, या कृत्यामागे कोणत्याही आतंकवादी किंवा दहशतवादी संघटनेचा हात आहे का, याची सुद्धा सखोल चौकशी करण्यात यावी. जर प्रशासनाने तातडीने कठोर भूमिका घेतली नाही, तर अशा प्रवृत्तींचे मनोबल वाढण्याची शक्यता आहे. या देशात शांतता आणि सौहार्द जपण्यासाठी अशा कट्टरवादी प्रवृत्तींचा पूर्णतः नायनाट करणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रशासनाने याप्रकरणी कोणतीही सूट न देता, तातडीने कठोर निर्णय घ्यावा, ही माझी ठाम मागणी आहे. नसता लोकशाही मार्गाने तीव्र निषेध (आंदोलन) करण्यात येईल, असा इशारा आझाद पत्रकार शेख इमरोज शरीफ यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिला आहे.

## युवा संवाद मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित रहा : सचिन शिंदे

नेकनूर । प्रतिनिधी



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने पक्ष बांधणी आणि संघटन वाढविण्यावर भर दिला असून दि.२ एप्रील रोजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत बीडमध्ये युवा संवाद मेळाव्याचे आयोजन केले आहे. या मेळाव्यास राष्ट्रवादीच्या युवा कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन नेकनूर चे उपसरपंच सचिन शिंदे यांनी केले आहे.
बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात हा युवा संवाद मेळावा होत आहे. सकाळी ९ वाजता उपमुख्यमंत्री अजित पवार या मेळाव्यासाठी येणार आहेत. या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून आ.धनंजय मुंडे, आ. प्रकाश सोळंके, आ.विजयराजे पंडित, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, माजी आ. बाळासाहेब आजबे, राष्ट्रवादी ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे हे उपस्थित राहणार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते तथा बीड पंचायत समितीचे मा.सभापती बळीराम गवते यांच्या नियोजनाखाली हा युवा संवाद मेळावा होत आहे. दि.२ एप्रील रोजी उपमुख्यमंत्री अजित पवार हे सकाळी ८ वाजता बीडमध्ये दाखल होणार आहेत. त्यानंतर ते पक्ष कार्यालयात कार्यकर्त्यांशी संवाद साधणार आहेत.
यानंतर यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात युवकांशी संवाद साधणार आहेत. या युवक मेळाव्यास जिल्ह्यातील आजी-माजी पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. या मेळाव्यास सर्व युवक कार्यकर्ते यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन नेकनूर चे उपसरपंच सचिन शिंदे यांनी केले आहे.

## ७ व्या दिवशी कंत्राटी कामगार प्रतिनिधी उपोषणकर्त्याची प्रकृती ढासळली

बीड । प्रतिनिधी
बीड जिल्हाधिकारी कार्यालया समोर छ.शिवाजी,म. फुले, डॉ आंबेडकर, मिशन प्रणित महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती रोजंदारी मजदूर सेनेच्या वतीने दिनांक २४ मार्च २०२५ पासून बीड नगर परिषद प्रशासन यांनी कंत्राटी कामगारांना अयोग्य व बेकायदेशीरपणे कामावरून कमी केले. त्यांना पगाराच्या सलगतेसह पुर्ववत कामावर घ्यावे या मागणीसह इतर मागण्या करीता अन्नत्याग उपोषण सुरू केले होते. ०७ व्या दिवशी आरोग्य तपासणी केली असता उपोषणकर्ते भाई राजेश कुमार जोगदंड यांना सरकारी दवाखान्यात दाखल करण्याचा सल्ला यावेळी वैद्यकीय तज्ञांनी दिला होता. परंतु त्यांनी उपचारासाठी दवाखान्यात दाखल होण्यास नकार दिला आहे.
दरम्यान आता उपोषणकर्त्याची प्रकृती ढासळण्यास सुरुवात झाली असून तब्येत खालावली आहे. जिल्हा प्रशासनाच्या वतीने आणखी कोणतीही हालचाल होत नसल्याचे दिसून येत आहे. शासन तिरक्या नजरेने इकडे पाहत आहे. शासकीय यंत्रणेने बीड जिल्ह्यातील कंत्राटी कामगारांना शासनाने निर्धारित केलेले किमान वेतन, विशेष भत्ते व त्यांच्या सोयी – सुविधा देण्यासाठी निर्देश दिले आहेत. परंतु बीड जिल्ह्यातील सर्व मुख्याधिकारी नगरपरिषद/ नगरपंचायत यांच्या अधिनस्त असलेले कंत्राटदार व मुख्य अभियंता औष्णिक विद्युत केंद्रातील युनिट ०६,०७ व०८ मधील विभाग प्रमुखांच्या अधिनस्त असलेले कंत्राटदार कंत्राटी कामगारांना किमान वेतन व प्रचलित भत्ते व इतर सोयी सुविधा देत नाहीत. अल्प वेतन देऊन करोडो रुपये कमवनार्य कंत्राटदारांवर मोका कायद्याअंतर्गत




कार्यवाही करून त्यांना काळ्या यादीत टाकावे अशी मागणी रोजंदारी मजदुर सेना केंद्रीय महासचिव भाई गौतम आगळे सर यांनी निवेदनाद्वारे केली आहे. जिल्हाधिकारी बीड यांना दिलेल्या निवेदनात आगळे यांनी नमूद केले आहे की, शासनाने विविध परिपत्रक काढले आहेत. त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करून, कंत्राटदारांनी जो मागील अनेक वर्षांपासून कंत्राटी कामगारांना अल्प वेतन देऊन बेकायदेशीरपणे पिळवणूक करून गंभीर गुन्हा केलेला आहे, करोडो रुपयांचा अपहार करून कंत्राटदारांनी शासनाला व संबंधित कंत्राटी कामगारांना फसविण्याचे काम केले आहे. शासनाने निर्धारित केलेले किमान वेतन कायद्यानुसार वेतन,भत्ते कर्मचारी भविष्य निर्वाह निधीची रक्कम हडप करणार्या व करोडो रुपयांची माया जमविनार्य कंत्राटदारांवर मकोका अंतर्गत गुन्हे दाखल करून त्यांना काळ्या यादीत टाकावे.
तसेच कंत्राटदार कंत्राटी कामगारांना मागील अनेक वर्षांपासून बेकायदेशीरपणे पिळवणूक करून संघटितपणे गुन्हेगारी करत आहेत. त्यांच्या या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी त्यांच्यावर कारवाई होणे गरजेचे आहे. सदरील निवेदनाच्या प्रत राज्याचे मुख्यमंत्री तथा उर्जा मंत्री, देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्हा पालकमंत्री अजित पवार तसेच शासनातील संबंधित सनदी अधिकारी यांना ईमेल द्वारे रवाना केल्या आहेत. जर न्याय मिळाला नाहीतर दिनांक ०२ एप्रिल २०२५ रोजी उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्हा पालकमंत्री अजित पवार यांना घेराव घालून निवेदन देण्यात येइल. यावेळी काही अनुचित प्रकार घडला तर त्यास महाराष्ट्र शासन व शासनातील संबंधित सनदी अधिकारी, व कंत्राटदार हेच जबाबदार राहतील याची कृपया गांभीर्यपूर्वक नोंद घ्यावी. असे दिलेल्या निवेदनात नमूद केल्याची माहिती संघटनेचे केंद्रीय महासचिव भाई गौतम आगळे सर यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT